NRB INDUSTRIAL

NIBL/BSE/NSE/2025-26

Date: 7th November, 2025

**BSE Limited**
**Listing Department**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai - 400 001.
Maharashtra, India.
Scrip Code: **535458**

**National Stock Exchange of India Limited**
**Listing Department**
Exchange Plaza, 5th Floor, Plot No. C/1, G Block,
Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400 051. Maharashtra, India
Symbol: **NIBL**

Dear Sir/ Madam,

**Sub: Newspaper Publication of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the quarter and half year ended 30th September, 2025.**

Pursuant to Regulation 47 the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI Listing Regulations'), please find enclosed herewith the newspaper publications of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the quarter and half year ended 30th September, 2025, of the Company published on Friday, 07th November, 2025, in Free Press Journal (English Newspaper) and Navshakti (Marathi Newspaper).

You are requested to take on your record and oblige.

Yours Sincerely,
For **NRB Industrial Bearings Limited**

VANDANA DEEPAKKUMAR YADAV — Digitally signed by VANDANA DEEPAKKUMAR YADAV Date: 2025.11.07 11:18:49 +05'30'

**Vandana Yadav**
**Company Secretary & Compliance Officer**

Encl. as above

## City students represent India at UN



**Dhairya Gajara**
MUMBAI

Mumbai-based students Bhadra Tolia,11, and Divyam Shah,10, became the youngest student ambassadors to the United Nations, representing India at the UN World Summit on Sustainable Health and Wellbeing. The summit focused on advancing global health equity under the UN's 2030 Sustainable Development Goals.

Students of Jain saint Namramuni Maharaj's Look N Learn Jain Gyan Dham, they spoke on mental obesity, describing it as a cause of anxiety and emotional fatigue. They suggested three tools inspired by Jain philosophy and supported by neuroscience: brain rest, sonic massage for the brain, and the power of forgiveness.

The duo highlighted their institution's role in promoting moral education and wellbeing. They received UN Honour Pins for their contribution.

# ₹100cr scam in Wadala project

**Poonam Apraj**
MUMBAI

The Mumbai Police's Economic Offences Wing (EOW) has registered an FIR in connection with a large-scale housing fraud involving the Sky 31 project in Wadala (West), alleging that the developers misappropriated around Rs100 crore collected from flat purchasers.

According to police, the FIR has been registered at RAK Marg Police Station under Sections 420 (cheating), 406 (criminal breach of trust), and 34 (common intention) of the Indian Penal Code following a preliminary inquiry.

The complaint was filed by Anil Mohanlal Dron,62, a chartered accountant residing at Kandivali (West). The accused have been identified as Subbaraman Anand Vilayanur, Uma Subbaraman, BP Ganger Constructions Pvt Ltd, and other unidentified persons.

The alleged fraud took place between 2018 and the present. The EOW police said the accused, in connivance with each other, collected around Rs100 crore from 102 homebuyers under the pretext of constructing flats in the Sky 31 project at Katrak Road, Wadala (West). However, instead of utilising the funds entirely for construction, the accused allegedly diverted a significant portion of the money for their personal benefit and to accounts of their associated companies.

**The complaint was filed by Anil Mohanlal Dron,62, a chartered accountant residing at Kandivali (West)**

Investigators also found that the same flat in the building was sold to two different buyers, from whom the accused collected payment separately, thereby defrauding both.



**Choking under neglect**

Palm trees at Sant Gadge Maharaj Chowk monorail station wither away, suffocated by debris and garbage-filled divider – Salman Ansari

**RELIEF | High Court orders psychological counselling, directs State to bear medical costs**

# HC orders MTP for 15-yr-old survivor

**Urvi Mahajani**
MUMBAI

The Bombay High Court on Thursday permitted a 15-year-old rape survivor, who has borderline intellectual functioning (IQ 80), to undergo medical termination of pregnancy (MTP), observing that continuation of the pregnancy would cause her "grave anguish" and pose serious mental health risks.

A bench of Justices Revati Mohite-Dere and Sandesh Patil passed the order while hearing a plea filed by the minor through her father. The girl, 15 years and seven months old, was sexually assaulted by her neighbour and is currently 27 weeks pregnant. She is studying in Class X and is due to appear for her board exams in March 2026.

On October 31, the HC had referred her case to a medical board at Sir JJ Hospital. The board's report, submitted on November 6, stated: "On detailed review of clinical records, psychiatric, paediatric and psychological evaluation... it is noted that the petitioner is a minor (age 15 years)... with no gross lethal congenital anomaly." Although the board said it was not empowered to recommend termination beyond 24 weeks, it added that "if the Hon'ble Court is of view that continuation of pregnancy would have grave anguish to the petitioner while continuing an unwanted pregnancy, the Hon'ble Court may consider permitting termination".

The court took note of the medical opinion of Dr. Mujahid Shaikh, Assistant Professor, Department of Psychiatry, JJ Hospital, who said the girl "would not be in a position to take care of the baby emotionally, financially and socially" and that continuation of pregnancy "would pose great risk of depression, anxiety, post-traumatic stress and disruption of psychological development." A clinical psychologist, Ms. Zainab Khan, also noted that children with borderline intellectual functioning "have slow mental processing and underdeveloped planning and problem-solving skills".

Both parents, who are labourers, filed affidavits consenting to termination. The court directed that the procedure be carried out at Sir JJ Hospital "expeditiously, keeping in mind the petitioner's health and safety," and that she be given "psychological counselling, both before and after the procedure".

It further ordered that if the child is born alive, the hospital must provide intensive care at the State's expense and preserve DNA samples for the criminal trial. The bench also directed the government to process and release interim compensation to the survivor under the Manodhairya Scheme "at the earliest".

**IN BRIEF**

1. The girl, 15 years and seven months old, was sexually assaulted by her neighbour
2. On October 31, the HC had referred her case to a medical board at Sir JJ Hospital
3. She is studying in Class X and is due to appear for her board exams in March 2026

## Civic officials oppose post extension

**Shefali Parab-Pandit**
MUMBAI

At least 17 senior officials of the civic body have jointly opposed retired Deputy Municipal Commissioner Chandrashekhar Chore continuing in a key post, insisting it belongs to their cadre. In a letter to Municipal Commissioner Bhushan Gagrani, they argued that keeping the post vacant has stalled promotions from assistant to deputy commissioner, creating "a sense of injustice" among eligible candidates. Chore retired as Deputy Municipal Commissioner (Commissioner's Office) on December 31, 2024, but his tenure was extended for another year, ending next month. This caused discontent among senior officials, who believe the vacancy should have been filled internally.

The joint letter, signed by Deputy and Joint Commissioners, noted the post has been vacant for two years and urged filling it from within the ranks of Deputy Commissioner, Joint Commissioner, or Assistant Commissioner. The officials said external appointments have stalled promotions, causing widespread dissatisfaction. Gagrani declined to comment. Chore stated, "I have always followed administrative decisions and will do that now too."

# HC to hear Amol's plea on theatre pre-censorship

**Urvi Mahajani**
MUMBAI



**A bench scheduled the hearing for December 5**

After nearly a decade, the Bombay High Court on Thursday said it will hear in December actor **Amol Palekar's** petition seeking protection of artistic freedom and challenging the mandatory pre-censorship of plays and dramas.

A bench of Justices Riyaz Chagla and Farhan Dubash scheduled the hearing for December 5 after Palekar's counsel, Anil Anturkar, requested that the 2016 petition be finally taken up. "The petitioner is 85 years old now and wants an outcome, be it positive or negative," Anturkar told the court.

The counsel said the limited issue before the court is whether, under the provisions of the Bombay Police Act, the police have the authority to impose pre-censorship on plays and performances. "We are now in an era where there is no censorship of shows and series on OTT platforms," he argued.

In his petition, Palekar has challenged the rules framed under Section 33(1)(wa) of the Bombay Police Act, which empower the Commissioner or Superintendent of Police to regulate "places of public amusement" and "performances for public amusement" — including plays, tamashas, and melas.

These rules mandate prior scrutiny of scripts by the Maharashtra State Performance Scrutiny Board to ensure compliance with public order, decency, or morality. Performances can only be staged after the Board issues a certificate, often subject to conditions.

Palekar contends that such pre-censorship amounts to an unconstitutional restriction on artistic expression. "This pre-censorship leads to curtailment of artistic freedom. Because of this, many historic plays have not been performed in their original form," his petition states.

The HC had admitted the plea in September 2017 but it has not been heard on merits since then. The court will now take it up for final hearing on December 5.

## Andheri trader held by EOW

**Poonam Apraj**
MUMBAI

The Economic Offences Wing (EOW) of Mumbai Police arrested Sandeep Babulal Gada,39, a furniture and plywood businessman from Andheri (West), in a crores financial fraud case. Registered under multiple Bharatiya Nyaya Sanhita (BNS) 2023 sections, including cheating, forgery, and criminal conspiracy, Gada was detained after evidence linked him to fraudulent transactions. He will be produced before the Esplanade court on Friday. The EOW is probing the financial trail and other associates.

## FIR in vehicle theft scam

**Poonam Apraj**
MUMBAI

An FIR was filed at DN Nagar Police Station after two unidentified men allegedly deceived Constable Altab Karim Beldar and took a seized white Suzuki Burgman scooter (MH 03 ET 9419) on August 14. The scooter, impounded on August 10 for a missing number plate, belonged to Anas Khan's wife, Shabina. The men, posing as relatives, paid a Rs2,000 fine via QR code and retrieved the vehicle. On August 18, Khan denied knowing the men shown in CCTV footage.

## Bizman duped of ₹2.44 crore

**Poonam Apraj**
MUMBAI

VP Road Police registered a case against Pushpendra Manmal Angara for defrauding businessman Ritesh Ramlal Angara of rs2.44 crore. Pushpendra falsely claimed ownership of Ritesh's firm, Kartik Ferromet Pvt Ltd, and diverted funds to fake company accounts. He induced payments from companies for metal sales, then withdrew the money for personal gain. An FIR under Bharatiya Nyaya Sanhita for cheating and criminal breach of trust has been filed, with police tracing the diverted funds.

## Man loses ₹1cr in trading scam

**Somendra Sharma**
MUMBAI

A 40-year-old Vasai man, a senior employee in Malad, was defrauded of Rs1.08 crore by a scammer met via a matrimonial app in September. After gaining his trust, the scammer introduced a fraudulent currency trading website and app. From September 29 to October 13, the victim transferred Rs1.08 crore in nine transactions. When he attempted to withdraw earnings, the scammer demanded Rs28 lakh in taxes. Realizing the fraud, he reported it online. MB-VV police registered a case under cheating and IT Act provisions, using the scammer's contact number, website link, and transaction details for investigation.



Filmmaker Leena Yadav (right) inaugurated an exhibition of paintings by Shikha Patel at the Jehangir Art Gallery

# State to import tech to reduce food waste

**Amit Srivastava**
MUMBAI

In a significant step towards reducing food wastage and stabilising agricultural markets, Maharashtra is set to introduce advanced foreign technology capable of extending the shelf life of perishable products. The Food and Drug Administration (FDA) has begun discussions with companies from Germany and Japan to bring this technology to India, with a MoU expected soon.

According to FDA Minister Narhari Zirwal, the initiative will benefit farmers, consumers, and the food industry by ensuring that agricultural produce remains fresh for longer and reaches markets in better condition. Farmers often face losses due to sudden gluts that lead to price crashes, and the lack of adequate storage facilities results in large quantities of produce being spoiled. Zirwal said the proposed technology would help break this cycle by preserving the quality of goods for extended periods.

The minister recently visited Germany to study advanced food storage and shelf-life enhancement methods. He said the visit helped the state understand how similar models could be adapted to Indian conditions. The new technology is expected to maintain freshness, prevent spoilage, and reduce wastage on a large scale. Officials said the technology can keep ready-to-eat items like chapatis fresh for up to six months, while onions and fruits can be preserved for six to eight months.

**ADOPT US**



CHIKI

She loves humans, belly rubs, and tug-of-war.
Age: Approx 9 months



MILKSHAKE

Milkshake's way is a dash of mischief, a sprinkle of play, and endless naps in sunlit corners.
Age: Approx 4 years



BHURA

He has a quiet soul and an adventurous heart.
Age: Approx 5 years



BROWNIE

Morning walks, human hugs, and scarves that match her mood – that's Brownie's kind of bliss.
Age: Approx 1.5 years

w.s.d.

To adopt the dogs, Please call/Whatsapp WSD on 9892974973 or email wsdindia@gmail.com

Supported by THE FREE PRESS JOURNAL

## City exhibition celebrates Mumbai's Art Deco legacy

**Manoj Ramakrishan**
MUMBAI

Mumbai's Art Deco heritage, among the largest in the world after Miami, is being celebrated through an exhibition titled 'From Marine Drive to Ocean Drive', which opens on November 7. Organised by Art Deco Alive!, Art Deco Mumbai Trust, and Dr Bhau Daji Lad Museum as knowledge partners and collaborators, the exhibition traces the evolution and endurance of Mumbai's Art Deco style in its century year. Curated by Atul Kumar, the display features multimedia, archival photographs, oral history accounts, and rare artefacts and furniture from private collections. The exhibition debuted in Miami before travelling to city.

Art Deco influenced architecture, interiors, furniture, neon lighting, typography, fashion, and even cinema posters. To expand understanding of the style, the event will include a museum show, speaker series, guided walks, film screenings, cinema tours, and workshops on sketching, typography, jazz, fashion, and jewellery. At the inauguration, Ashish Shelar said heritage appreciation begins when society engages with the stories embedded in its built environment. Bhushan Gagrani stressed that preserving Art Deco precincts remains a collective responsibility. Smiti Kanodia and Tasneem Zakaria Mehta highlighted protecting spaces that hold the city's cultural identity.

*Full report on https://www.freepressjournal.in/*

NRB INDUSTRIAL

**NRB INDUSTRIAL BEARINGS LIMITED**

Regd. Off.: 3rd Floor, Metro House, M. G. Road, Dhobi Talao, Mumbai, Maharashtra, 400020
CIN No. L29253MH2011PLC213963

**Extract of Statement of Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter and half year ended September 30, 2025.**

( ₹ in Lakhs)

| Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Quarter ended | Corresponding Quarter ended | Six months ended | Year ended | Quarter ended | Corresponding Quarter ended | Six months ended | Year ended |
| | 30.09.25 | 30.09.24 | 30.09.25 | 31.03.25 | 30.09.25 | 30.09.24 | 30.09.25 | 31.03.25 |
| | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| Total income from operations | 1,907.10 | 1,689.84 | 3,889.82 | 6,603.67 | 1,907.10 | 1,689.84 | 3,889.82 | 6,603.67 |
| Loss before tax and exceptional items | (701.78) | (747.55) | (1,231.19) | (2,817.06) | (701.78) | (747.55) | (1,231.19) | (2,817.06) |
| Exceptional Item- (Gain) | - | - | - | 4,646.76 | - | - | - | 4,646.76 |
| Profit/ (Loss) after tax and exceptional item | (701.78) | (747.55) | (1,231.19) | 1,829.70 | (701.78) | (747.55) | (1,231.19) | 1,829.70 |
| Share of Profit/(Loss) of associate | - | - | - | - | 27.43 | 10.88 | 47.96 | 34.09 |
| Profit/(Loss) after tax and after share of Profit of associate | (701.78) | (747.55) | (1,231.19) | 1,829.70 | (674.35) | (736.67) | (1,183.23) | 1,863.79 |
| Other Comprehensive Income (OCI) | 7.74 | 7.75 | 15.48 | 168.17 | 7.62 | 8.23 | 15.24 | 167.69 |
| Total Comprehensive Income for the period | (709.52) | (755.30) | (1,246.67) | 1,661.53 | (681.97) | (744.90) | (1,198.47) | 1,696.10 |
| Paid-up equity share capital (Face value of the share Rs. 2/- each) | 484.61 | 484.61 | 484.61 | 484.61 | 484.61 | 484.61 | 484.61 | 484.61 |
| Earnings per share of Rs. 2 each: (not annualised): | - | - | - | - | - | - | - | - |
| Basic and Diluted (In Rs.) | (2.90) | (3.09) | (5.08) | 7.55 | (2.78) | (3.04) | (4.88) | 7.69 |

**Note:**

1 The above is an extract of the detailed format of Statement of Standalone Unaudited Financial Results for the quarter and half year ended September 30, 2025 and Consolidated Unaudited Financial Results for the quarter and half year ended September 30, 2025, filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Standalone and Consolidated Unaudited Financial Results are available on the Stock Exchange websites viz www.bseindia.com and www.nseindia.com and also on the Company's website www.nrbindustrialbearings.com.

2 The above standalone and consolidated financial results of the company and its associates for the quarter and half year ended September 30, 2025 were reviewed by the Audit Committee, approved by the Board of Directors at its meeting held on 06th November, 2025.

Place : Mumbai
Date : November 06, 2025

D. S. Sahney
Chairman and Managing Director

# ठाण्यात कार्यरत महिलांसाठी अत्याधुनिक वसतिगृह

## भाईंदरपाडा येथे भूसंपादन; ५० कोटींचा निधी मंजूर

**ठाणे :** ठाणे शहरात नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेल्या महिलांसाठी उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक महिला वसतिगृहाचे भूमिपूजन गुरुवारी भाईंदरपाडा येथे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते पार पडले. ठाणे महापालिकेतर्फे उभारल्या जाणाऱ्या या उपक्रमाला महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व स्थानिक महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या वेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील लाडक्या बहिणींसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत आणि पात्र महिलांसाठी दरमहा १५०० रुपयांच्या पेन्शन योजनेसह अनेक उपक्रम राबविले आहेत. याच योजनांचा विस्तार म्हणून ठाणे शहरात वास्तव्यास असलेल्या कार्यरत महिलांसाठी 'भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय योजना' अंतर्गत ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हा निधी मिळवण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून स्वतःने विशेष पाठपुरावा केल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

या सुविधेमुळे ठाण्यात नोकरी-व्यवसाय करणाऱ्या तसेच बाहेरून येणाऱ्या महिलांना सुरक्षित आणि दर्जेदार निवासाची सोय होणार आहे. शहराच्या सामाजिक प्रगतीच्या दिशेने ही एक महत्त्वाची पायरी असल्याचे स्थानिक पातळीवर मानले जात आहे. कार्यक्रमास कार्यकारी अभियंता धनंजय मोदे, माजी नगरसेवक सिद्धार्थ ओवळेकर, माजी नगरसेविका साधना जोशी, विभाग प्रमुख रवी घरत, राजेंद्र पाटील, साजन कासार, कृष्णा भोईर, महिला विभाग प्रमुख रोहिणी ठाकूर आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.



### नऊ मजली अत्याधुनिक वसतिगृह

भाईंदरपाडा–घोडबंदर रोड परिसरात उभारण्यात येणारे हे वसतिगृह नऊ मजली असून आधुनिक सोयीसुविधांनी युक्त असेल. यामध्ये वाहन पार्किंग, फूड कोर्ट, मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी प्रशस्त सभागृह अशा सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध असतील. १०० खोल्यांच्या या वसतिगृहात ४०० कार्यरत महिलांना सुरक्षित, आरामदायी आणि परवडणारे निवासस्थान एकाच छताखाली मिळणार आहे. पुढील दोन वर्षांत बांधकाम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

> कार्यरत महिलांसाठी सन्माननीय आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे आणि हे वसतिगृह त्या दिशेने ठाण्याचा आदर्श प्रयत्न ठरेल.
> **- प्रताप सरनाईक,** परिवहन मंत्री

## निवडक

### ठाणे पोलिसांचा 'नागरिक प्रथम पोलिसिंग' उपक्रम

**शहापूर :** नागरिक प्रथम पोलिसिंग या उपक्रमांतर्गत ठाणे ग्रामीण पोलिसांच्या वतीने जिल्ह्यातील नागरिकांना विविध गुन्ह्यांतील एकूण १,१८,९२,९७७ किमतीचा मुद्देमाल परत करण्यात आला. हा प्रशंसनीय कार्यक्रम ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या हस्ते आसनगाव येथील जोंधळे कॉलेज येथे पार पडला. गुन्हे तपासात वैज्ञानिक दृष्टिकोन आणण्याच्या दिशेने ठाणे ग्रामीण पोलिसांनी आणखी एक पाऊल टाकत नव्या फॉरेन्सिक व्हॅनचे लोकार्पण डॉ. स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. या अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅनमुळे गुन्हे तपास प्रक्रिया अधिक वेगवान, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि प्रभावी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, आपल्या कर्तव्यनिष्ठ व उल्लेखनीय कामगिरीबद्दल ठाणे ग्रामीण पोलीस दलातील तपासी अधिकारी व अंमलदारांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### पनवेलमध्ये 'वंदे मातरम्' समूह गायनाचा कार्यक्रम

**उरण :** देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना अभिवादन करण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात विशेष उपक्रम राबविले जात आहेत. त्याच अनुषंगाने रायगड जिल्ह्याचा प्रमुख कार्यक्रम आज (शुक्रवार, ७ नोव्हेंबर) सायं. ४ वाजता नवीन पनवेल येथील के. ए. बांठिया विद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात 'वंदे मातरम्' समूह गायन हा मुख्य उपक्रम ठरणार आहे. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमाची माहिती कार्यक्रम प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते व व्याख्याते शरद पोंक्षे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

### दीपोत्सव उत्साहात

**डोंबिवली :** डोंबिवलीतील ऐतिहासिक श्री गणेश मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सवाचा भव्य सोहळा यंदाही उत्साहात पार पडला. गणेश मंदिर संस्थान आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात येणारा हा दीपोत्सव भाविकांच्या मोठ्या गर्दीत संपन्न झाला. दीपोत्सवाच्या निमित्ताने रोटरी क्लब ऑफ डोंबिवली वेस्ट आणि इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली वेस्ट यांच्या सौजन्याने 'खाद्यतेल ज्ञानयज्ञ' उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत गरजू संस्थांसाठी खाद्यतेल संकलन तसेच देणगी गोळा करण्यात आली. धार्मिक उत्सव आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे शहरभरातून कौतुक होत आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर श्रमजीवीचे आंदोलन स्थगित

## कातकरी समाजाच्या हक्कांसाठी श्रमजीवीचा निर्धार

**ठाणे :** कातकरी समाजाच्या अस्तित्व आणि मूलभूत हक्कांसाठी ठाण्यात सुरू झालेले श्रमजीवी संघटनेचे 'आत्मक्लेशातून आत्मनिर्धाराकडे' हे आंदोलन गुरुवारी स्थगित करण्यात आले. बुधवारी सुरू झालेल्या आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व भाजप आमदार संजय केळकर यांच्या हस्तक्षेपानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे आश्वासन मिळाल्याने उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र हजारोंच्या सहभागातून ठाण्यात कातकरी समाजाचा आत्मनिर्धाराचा लढा अधिक जोमाने उभा राहिला.

कातकरी समाजाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आंदोलनस्थळी भेट देत श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित आणि अध्यक्ष रामभाऊ वारणा यांच्याशी चर्चा केली. सरकार आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोनद्वारे आंदोलनकर्त्यांशी थेट संवाद साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मंगळवारी उच्चस्तरीय बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली. आमदार स्नेहा दुबे या भेटीदरम्यान उपस्थित होत्या. बुधवारपासून सुरू असलेल्या 'आत्मक्लेशातून आत्मनिर्धाराकडे उपोषणा'ला गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सकारात्मक आश्वासनानंतर स्थगिती देण्यात आली. सायंकाळी दीपप्रज्वलन करून आंदोलनकर्त्यांनी 'अंधारातून उजेडाकडे' जाण्याचा संकल्प व्यक्त केला आणि उपोषण स्थगित करण्यात आले. ठाणे व पालघर जिल्ह्यातील गाव-पाड्यात हजारो कुटुंबांनी घराबाहेर दिवे लावून आत्मनिर्धाराचा संकल्प केला. संस्थापक विवेक पंडित यांनी मौन भूमिका कायम ठेवत आंदोलनाचे मार्गदर्शन केले. एकूणच, शासनाने सकारात्मक आश्वासन दिल्याने उपोषण स्थगित झाले असले तरी श्रमजीवी संघटनेचा संघर्षाचा जाज्वल्य निर्धार कायम असून, मंगळवारी होणाऱ्या बैठकीत कातकरी समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### ठाण्यात ५० हजार श्रमजीवींची धडक

उपोषण स्थगित झाल्यानंतरही गुरुवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर श्रमजीवी संघटनेच्या हजारोंच्या संख्येने सभासदांनी 'आदिवासी बचाव–कातकरी बचाव' या घोषणांसह रॅली काढली. ५० हजारांहून अधिक सभासदांनी मोठ्या निर्धाराने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत तत्काळ उपाययोजना न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला.

### श्रमजीवी संघटनेचा इशारा

'सरकार काही करील' या भ्रमात राहायचे नाही. १९७६ मध्ये अस्तित्वात आलेल्या कायद्याची आजपर्यंत अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे २६ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व गावठाणातील कातकरी बांधवांना घरकुल मिळाले नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयात घुसून हक्क स्वतःच्या हाताने हिसकवून घेऊ, असा निर्धार संघटनेने व्यक्त केला.

> आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत सरकार संवेदनशील असून, आदिवासी समाजाच्या मागण्यांवर ठोस तोडगा निघावा, यासाठी मी स्वतः प्रयत्नशील राहीन. कातकरी समाजाच्या प्रत्येक प्रश्नाची माहिती शासनापर्यंत पोहोचवून न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.
> **- प्रताप सरनाईक,** परिवहन मंत्री

> आदिवासी समाजाचे प्रश्न हे दस्तऐवजीकरणापुरते मर्यादित नाहीत; ते त्यांच्या जगण्याशी जोडलेले आहेत. आधार कार्ड, निवास, उपजीविका, जमीन, शिक्षण यांसह अनेक विषयांवर शासन सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्वीही अनेक कठीण प्रश्न फक्त मार्गीच लावले नाहीत, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल याची हमी दिली. हे प्रश्न देखील आपण निकालात काढणार आहोत. आदिवासी समाजाच्या हक्कासाठी आपण आवाज उठवला आणि शासनाने तो प्रामाणिकपणे ऐकला. आता पुढील टप्पा म्हणजे प्रश्नांचे ठोस समाधान करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
> **- संजय केळकर,** आमदार भाजप

> कातकरी समाज निरक्षरता, गरिबी, स्थलांतर, वेठबिगारीचे पुनरुज्जीवन, अल्पवयीन मुलींचे शोषण, बालमृत्यू, अपूर्ण जलजीवन योजना, अर्धवट शिक्षण, वनहक्क आणि गावठाण हक्कांची अंमलबजावणी न होणे अशा गंभीर संकटांना सामोरे जात आहे. हा लढा म्हणजे कातकरींच्या माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवण्याचा संकल्प आहे.
> **- रामभाऊ वारणा,** अध्यक्ष श्रमजीवी संघटना

> जर आजच्या घडीला त्यांचा जमिनीचा, घरकुलाचा आणि जगण्याचा हक्क सुरक्षित केला नाही, तर २०४७ पर्यंत हा समाज नकाशावरूनच पुसला जाईल. कायद्याची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय सरकार आणि प्रशासनाने घेतल्यासारखा दिसतो. प्रशासनाचे कामगार विभाग आणि महिला व बालविकास विभाग आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यात अपयशी ठरले असून, ते निरर्थक ठरले आहे.
> **- विवेक पंडित,** संस्थापक श्रमजीवी संघटना

# पालिका निवडणुकीची सूत्रे आ. संजय केळकरांकडे

## ठाण्यात शिंदे सेना आणि भाजपमध्ये तणाव

**ठाणे :** भाजपने आमदार संजय केळकर यांच्याकडे ठाणे महापालिका निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी सोपविल्यानंतर शिंदे सेना आणि भाजप यांच्यातील तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मागील काही दिवसांपासून केळकर यांनी शिंदे सेनेविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली असून, महायुतीत असूनही त्यांनी विविध मुद्द्यांवरून शिंदे सेनेची कोंडी केली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत केळकर हे शिंदे सेनेसाठी अडचणीचे ठरू शकतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

निवडणूक प्रमुखपद मिळाल्यानंतर भाजप-शिंदे सेना संघर्ष आणखी उग्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आगामी निवडणुकीत युती झाली नाही तर केळकर शिंदे सेनेला थेट सामोरे जाण्याची तयारी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. ठाण्यात मागील काही महिन्यांपासून महाविकास आघाडी विरुद्ध महायुती या संघर्षापेक्षा शिंदे सेना विरुद्ध भाजप असा संघर्ष ठळकपणे दिसून येत आहे.

नवी मुंबईत मी पक्षाला सत्ता मिळवून दिली; ठाण्यातही देऊ शकतो. आता नाईक यांच्याकडेच भाजपने जिल्हा निवडणूक प्रभारीपद सोपविले असून संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

### 'जनता दरबार'च्या माध्यमातून राजकीय धक्का

वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात 'जनता दरबार' सुरू करत शिंदे सेनेला राजकीय धक्का देण्याचा प्रयत्न केला. विविध कार्यक्रमांतून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. सेवा पंधरवडा बैठक असो वा भाजप पदाधिकारी मार्गदर्शन शिबिर प्रत्येक ठिकाणी नाईक यांनी ठाण्यातील सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

### केळकर यांचा 'अब की बार ७० पार' नारा

दुसरीकडे प्रदेशातील भाजप शिबिरात संजय केळकर यांनी 'अब की बार ७० पार' असा स्वबळाचा नारा दिला. आरोग्य मंदिर, नालेसफाई, कंत्राटी कामगार प्रश्न अशा विविध मुद्द्यांवरून त्यांनी शिंदे सेनेवर सतत टीका केली आहे. आता ठाणे शहर निवडणूक प्रमुखपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी भाजपने केळकर यांच्याकडे सोपविल्याने, शिंदे सेना–भाजप यांच्यातील संघर्ष आणखी चिघळण्याची पूर्ण शक्यता दिसत आहे.

# निवडणुकांची तारीख बदला

## मतदान रविवारी घ्यावे – माजी नगराध्यक्ष

**बदलापूर :** कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी मतदानाची तारीख मंगळवार, २ डिसेंबर जाहीर करण्यात आली आहे. परंतु शहराची भौगोलिक आणि व्यावसायिक रचना लक्षात घेता हा दिवस अनेक मतदारांसाठी प्रत्यक्ष मतदानात अडथळा ठरू शकतो, असे मत माजी नगराध्यक्ष राम पातकर यांनी व्यक्त केले आहे.

बदलापूर हे मुंबई-पुणे यांच्या मधोमध वसलेले शहर असल्याने येथे राहणारे अनेक नागरिक नोकरी वा व्यवसायानिमित्त दररोज मोठ्या शहरांकडे प्रवास करतात. कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी नागरिकांना सकाळी लवकर घराबाहेर पडावे लागते आणि रात्री परत येणेही उशिराच होते. अशा परिस्थितीत कामकाजाच्या दिवशी मतदान झाल्यास मोठ्या प्रमाणात मतदार मतदानापासून वंचित राहू शकतात, असे पातकर यांनी स्पष्ट केले.

### सुट्टीच्या दिवशीचा अधिक फायदा

मतदानाचे प्रमाण वाढावे आणि मतदारांना निर्बंधांशिवाय मतदान करता यावे, यासाठी मतदानाची तारीख रविवार, ७ डिसेंबर निश्चित करावी अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे निवेदनाद्वारे सादर केली आहे.

# कसाऱ्यातील २०० हून अधिक शिवसैनिक शिंदे गटात

**शहापूर :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर कसाऱ्यातील शिवसेना उबाठा गटातील २०० हून अधिक कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील व जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामूहिक प्रवेशामुळे कसारा परिसरातील राजकीय समीकरणांना मोठा कलाटणी मिळाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कसारा हा उबाठा गटाचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. अनेक निवडणुकांपासून येथील निष्ठावंत कार्यकर्ते त्यांच्याच पाठीशी राहिले होते. मात्र याच बालेकिल्ल्यात शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटाची वाट धरल्यामुळे आगामी निवडणुकांच्या राजकीय गणितात मोठे बदल दिसू लागले आहेत, असे जाणकारांचे मत आहे.



> मी या पक्षप्रवेशाचे क्रेडिट घेणार नाही. जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांच्या अथक परिश्रमांमुळे एवढा मोठा पक्षप्रवेश शक्य झाला आहे.
> **- प्रकाश पाटील,** शिवसेना उपनेते

# वसईतील विविध रस्त्यांच्या विकासकामांना सुरुवात

**वसई :** वसई विधानसभा मतदारसंघ तसेच बोईसर विधानसभा हद्दीतील वसईलगतच्या भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था लक्षात घेऊन, नागरिकांच्या हालअपेष्टा दूर करण्यासाठी आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर करून महानगरपालिका आयुक्तांना तातडीने कामे सुरू करण्याचे निर्देश दिले. महानगरपालिका आयुक्तांनी सर्व प्रस्तावांची तपासणी करून वसई तालुक्यातील १४ महत्त्वपूर्ण रस्त्यांच्या खडीकरण व डांबरीकरणाची प्रक्रिया गतिमान केली. त्यानुसार महानगरपालिकेने कार्यादेशही जारी केले असून, त्या पैकी ३ रस्त्यांच्या विकासकामांचा शुभारंभ गुरुवार, ६ नोव्हेंबर रोजी आमदार स्नेहा दुबे-पंडित यांच्या हस्ते करण्यात आला.



# निवडणुकीपूर्वी पेणमधील बॅनर्सवर कारवाई

## आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी

**पेण :** पेण नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीची लगबग आता सुरू झाली असून आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी प्रशासनाने कडक पद्धतीने सुरू केली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच पालिका प्रशासनाने शहरातील राजकीय बॅनर्स, पोस्टर्स हटवण्याची मोहीम राबवली. या मोहिमेत ४८ बॅनर्स व १४ भित्तीपत्रके हटवण्यात आली असून राजकीय उल्लेख असलेल्या २६ कोनशिला झाकण्यात आल्याचे चित्र पहावयास मिळाले.

दुबार मतदारांच्या पडताळणीसाठी विशेष उपक्रम सुरू करण्यात आला असून दुबार नावे असलेल्या मतदारांची यादी पालिकेच्या फलकावर लावण्यात येणार आहे. संबंधित मतदारांनी आपले नेमके मतदान केंद्र स्पष्ट करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

निवडणूक जाहीर होताच इच्छुक उमेदवारांकडून दाखल्यांसाठी पालिका कार्यालयात मोठी गर्दी झाली. शासकीय सुटी असूनही घरपट्टी, पाणीपट्टी, थकबाकी नसल्याचे दाखले घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी पालिका कार्यालयात धाव घेतली.

पालिका प्रशासनाने सुटीच्या दिवशीही दाखले उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर रोजी अलिबाग, उरण, कर्जत, माथेरान, मुरूड-जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन आणि महाड या ९ नगरपालिकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

मतदान २ डिसेंबर, मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे. जिल्ह्यात तब्बल ३ वर्षांनंतर नगरपरिषद निवडणुका होत असल्याने राजकीय वातावरणात उत्साहाचे वातावरण आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सार्वजनिक चौक, सरकारी इमारतींच्या भिंती आणि प्रमुख ठिकाणांवरील राजकीय जाहिराती, फलक आणि बॅनर्स काढण्याचे आदेश पालिकेने दिले होते. बुधवारी आणि गुरुवारी एकूण ४८ बॅनर्स हटवण्यात आले असून शहरातील विकासकामांच्या कोनशिला झाकण्यात आल्या आहेत.




### प्रशासनही सज्ज

आचारसंहिता काळात विनापरवानगी नवीन बॅनर वा पोस्टर लावल्यास आयोगाच्या नियमांनुसार संबंधित पक्ष किंवा इच्छुक उमेदवारांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असा इशारा निवडणूक विभागाने दिला आहे. पेणमधील निवडणूक वातावरण दिवसेंदिवस तापत असून, प्रशासनही आदर्श आचारसंहिता तंतोतंत पाळली जावी यासाठी सज्ज झाले आहे.

NRB INDUSTRIAL

**एनआरबी इंडस्ट्रियल बेअरिंग्ज लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : ३रा मजला, मेट्रो हाऊस, एम. जी. रोड, धोबी तलाव, चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२०.
सीआयएन : L29253MH2011PLC213963

**दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या स्थायी व एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाचा सारांश**

(रु. लाखात)

| तपशिल | स्थायी | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाही अखेर | अनुषंगिक तिमाही अखेर | सहामाही अखेर | वर्ष संपलेले | तिमाही अखेर | अनुषंगिक तिमाही अखेर | सहामाही अखेर | वर्ष संपलेले |
| | ३०.०९.२५ | ३०.०९.२४ | ३०.०९.२५ | ३१.०३.२५ | ३०.०९.२५ | ३०.०९.२४ | ३०.०९.२५ | ३१.०३.२५ |
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| परिचलनातून एकूण उत्पन्न | १,९०७.१० | १,६८९.८४ | ३,८८९.८२ | ६,६०३.६७ | १,९०७.१० | १,६८९.८४ | ३,८८९.८२ | ६,६०३.६७ |
| करपूर्व तोटा आणि अपवादात्मक वस्तू | (७०१.७८) | (७४७.५५) | (१,२३१.१९) | (२,८१७.०६) | (७०१.७८) | (७४७.५५) | (१,२३१.१९) | (२,८१७.०६) |
| अपवादात्मक वस्तू – (प्राप्त) | – | – | – | ४,६४६.७६ | – | – | – | ४,६४६.७६ |
| नफा / (तोटा) करानंतर आणि अपवादात्मक वस्तू | (७०१.७८) | (७४७.५५) | (१,२३१.१९) | १,८२९.७० | (७०१.७८) | (७४७.५५) | (१,२३१.१९) | १,८२९.७० |
| कर व सहयोगींचा नफा/तोटा (वाटा) | – | – | – | – | २७.४३ | १०.८८ | ४७.९६ | ३४.०९ |
| नफा /(तोटा) करानंतर आणि सहयोगींच्या नफ्याच्या वाटयानंतर तोटा | (७०१.७८) | (७४७.५५) | (१,२३१.१९) | १,८२९.७० | (६७४.३५) | (७३६.६७) | (१,१८३.२३) | १,८६३.७९ |
| इतर सर्वसमावेशक उत्पन्न (OCI) | ७.७४ | ७.७५ | १५.४८ | १६८.१७ | ७.६२ | ८.२३ | १५.२४ | १६७.६९ |
| कालावधीसाठी एकूण उत्पन्न | (७०९.५२) | (७५५.३०) | (१,२४६.६७) | १,६६१.५३ | (६८१.९७) | (७४४.९०) | (१,१९८.४७) | १,६९६.१० |
| पेड–अप इक्विटी शेअर भांडवल शेअरचे दर्शनी मूल्य रु. २/– प्रत्येक) | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ |
| उत्पन्न प्रतिशेअर रु. २/– प्रत्येक : (अवार्षिकीकृत) | – | – | – | – | – | – | – | – |
| मूलभूत व सौम्यीकृत (रु) | (२.९०) | (३.०९) | (५.०८) | ७.५५ | (२.७८) | (३.०४) | (४.८८) | ७.६९ |

**टिपा :**

१ वरील तपशील हा सेबी (सूचिबध्दता अनिवर्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सेंचेजसकडे दाखल करण्यात दि. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिता स्थायी अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या तसेच दि. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. स्थायी व एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारुप स्टॉक एक्सेंचेजसच्या वेबसाईट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट www.nrbindustrialbearings.com वरही उपलब्ध आहे.

२ दि. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिता कंपनी व त्यांच्या सहयोगींच्या वरील स्थायी व एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले होते, संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ६ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित सभेत मंजुरी देण्यात आली होती.

ठिकाण : मुंबई
दिनांक : नोव्हेंबर ०६, २०२५

डी. एस. सहानी
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक